


कोल्हापूर : संजय घोडावत ग्रुपच्या वतीने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत वाटप करताना संजय घोडावत, श्रेणिक घोडावत व अन्य.

# संजय घोडावत ग्रुपकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन व घोडावत ग्रुप यांच्या वतीने शिरोळ व हातकणंगले तालुक्यातील निवड केलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत वाटप करण्यात आली. उद्योजक संजय घोडावत यांच्या हस्ते या सव्वा कोटी रुपयांच्या मदतीचे वाटप करण्यात आले.

उद्योजक घोडावत म्हणाले, दान करणे हा माणुसकी धर्म आहे. भविष्यात नैसर्गिक अडीअडचणी आल्यास आपण सदैव मदतीस अग्रभागी राहू. यावेळी कार्यक्रमास उपस्थित शीतल मणेरे यांनी शेतकऱ्यांना अडीच लाख रुपयांची मदत जाहीर केली. यावेळी श्रेणिक घोडावत, विश्वस्त विनायक पाटील, संचालक डॉ. रायकर, श्रीमती जयकुमारी, प्राचार्य व्ही. व्ही. गिरी आदींसह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सोहम टिपडे यांनी मानले.